## बातमी क्रं. १

जळगाव, दि. १९ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र प्रशाळेच्या इलेक्ट्रॉनिक्स विभागामार्फत बी.एस्सी. (ऑनर्स) इलेक्ट्रॉनिक्स या चार वर्षांच्या उद्योगाभिमुख पदवी अभ्यासक्रमासाठी १६ जून २०२६ पासून प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. इलेक्ट्रॉनिक सेक्टर स्किल कौन्सिल ऑफ इंडिया यांच्या सहकार्याने हा अभ्यासक्रम राबविण्यात येत असून विद्यार्थ्यांना आधुनिक इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील कौशल्याधारित शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.या अभ्यासक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रथम तीन वर्षे यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाची नियमित बी.एस्सी. (इलेक्ट्रॉनिक्स) पदवी प्रदान केली जाते. त्यानंतर चौथ्या वर्षात उद्योगक्षेत्रातील अप्रेंटिसशिप (उद्योग प्रशिक्षण) पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना बी.एस्सी. (ऑनर्स) इलेक्ट्रॉनिक्स पदवी मिळते. प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांना उद्योगातील प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळण्यासोबतच मासिक मानधनाची संधीही उपलब्ध होते.विद्यार्थ्यांना इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स मध्ये मेजर तसेच सोलर फोटो होलटाईक किंवा डेटा सायन्स या विषयांपैकी मायनर निवडण्याची सुविधा या अभ्यासक्रमात उपलब्ध आहे. याशिवाय शिष्यवृत्ती, उच्च शिक्षणाच्या संधी आणि रोजगाराभिमुख प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांसाठी हा अभ्यासक्रम विशेष उपयुक्त ठरणार आहे.बारावी विज्ञान, डिप्लोमा, आयटीआय किंवा एम.सी.व्ही.सी. उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी हा अभ्यासक्रम उज्ज्वल करिअर घडविण्याची सुवर्णसंधी असल्याचे विद्यापीठाने म्हटले आहे. “तीन वर्षांत बी.एस्सी. पदवी आणि चौथ्या वर्षात उद्योग प्रशिक्षणासह बी.एस्सी. (ऑनर्स) पदवी” या संकल्पनेतून विद्यार्थ्यांना उद्योगस्नेही शिक्षण देण्यावर भर देण्यात आला आहे.अभ्यासक्रमासंदर्भातील अधिक माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील यूजी/पीजी प्रवेश २०२६-२७ विभागात उपलब्ध असून इच्छुक विद्यार्थ्यांनी त्वरित नोंदणी करून प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन भौतिकशास्त्र प्रशाळेच्या संचालकांनी केले आहे.

## बातमी क्रं.२

जळगाव : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या कौशल्याभिमुख आणि ज्ञानवर्धक ऑनलाईन प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला २२ जूनपासून प्रारंभ होत आहे. या निमित्ताने अभ्यासक्रमांच्या माहितीपत्रकाचे (फ्लायर) उद्घाटन जळगावचे ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. सुशील अत्रे यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस टी इंगळे, अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक प्रा. मनिष जोशी, प्रा. आशुतोष पाटील, प्रा. समीर पी. नारखेडे, डॉ. राजेश बी. जवळेकर, प्रा. प्रवीण महाले, डॉ. चंद्रशेखर वाणी आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी बोलताना ॲड. सुशील अत्रे म्हणाले की, आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे राबविण्यात येणारे अभ्यासक्रम ज्ञानवृद्धी, वैयक्तिक विकास आणि आवड जोपासण्यासाठी आहेत. बदलत्या काळात तंत्रज्ञानाचा सकारात्मक वापर, परदेशी भाषा शिक्षण आणि कौशल्याधारित अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी नव्या संधी निर्माण करू शकतात, असेही त्यांनी सांगितले.प्रास्ताविकात प्रा. मनिष जोशी यांनी विभागाच्या विविध उपक्रमांची माहिती देताना चालू शैक्षणिक वर्षात विभागामार्फत जर्मन भाषा परिचय, जर्मन A1 स्तर, जपानी भाषा, मोडी लिपी परिचय, संस्कृत भाषा परिचय, सायबर गुन्हे आणि कायदे, मानसशास्त्रीय कसोट्या व मोजमाप, कवयित्री बहिणाबाई चौधरी यांचे जीवन व काव्य तसेच तथागत भगवान बुद्ध आणि त्यांचे तत्त्वज्ञान अशा दोन व चार क्रेडिटच्या विविध ऑनलाईन अभ्यासक्रमांची सुविधा उपलब्ध करण्यात आली असल्याचे सांगितले.कुलगुरू प्रा. डॉ. व्ही. एल. माहेश्वरी यांनी विद्यार्थ्यांनी केवळ पदवी संपादनावर भर न देता कौशल्यविकासालाही समान महत्त्व द्यावे, असे आवाहन केले. डिग्रीसोबत कौशल्यांची जोड मिळाल्यास क्षमताधारित व्यक्तिमत्त्व विकसित होऊन रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतात, असे त्यांनी नमूद केले. गृहिणी, व्यावसायिक आणि नोकरदार व्यक्तींनाही आपल्या वेळेनुसार घरबसल्या शिक्षण घेण्याची सुविधा या अभ्यासक्रमांमुळे उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी अभ्यासक्रम पूर्ण केलेले निवृत्त शिक्षक शिवाजी पाटील, सोनाक्षी सैंदाणे आणि मनस्वी सैंदाणे यांनी आपले अनुभव मांडले. विद्यापीठाकडून मिळणाऱ्या प्रमाणपत्राचे करिअरच्या

दृष्टीने महत्त्व आणि अभ्यासक्रमांची उपयुक्तता त्यांनी अधोरेखित केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मनिषा जगताप यांनी तर आभार श्री. कल्पेश पाटील यांनी मानले.

-----------------------------------------------------------------------------------------------------------------

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: १९ जुन, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनंसपर्क अधिकारी